# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/11/2022 (गुरूवार) सकाळ

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील फुकट नगर, कन्हान येथे दिनांक २३/११/२०२२ चे १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रविकांत रामदास कंडे, वय ४५ वर्ष, रा. चनकापुर कॉलोनी, क्वा. नं २६/१ खापरखेडा हे डब्लु. सी. एल. कामठी सब एरीया येथे गार्ड इंचार्ज असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी गार्ड यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून आरोपी नामे— संदीप रमेश बंदुलिया, रा. संताजी नगर, कांद्री कन्हान हा मारोती सुजुकी ८०० गाडी क्र. एम. एच.—३१/ए. एच.— ६६९० मध्ये कोळसा घेवुन जात आहे, अशा मिळालेल्या गोपनीय माहीती वरून फिर्यादीने पोलीस स्टेशन कन्हान येथे फोन करून पोलीस स्टाफची मागणी केली असता फिर्यादी व पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ घटनास्थळी गेले असता तेथे कोळशाचे अंदाजे प्रति किलो ८/— रू. प्रमाणे किमती अंदाजे ४०००/— रू. कोळसा तसेच मारोती सुजुकी ८०० क्र. एम एच.—३१ ए. एच.— ६६९० किंमती अंदाजे ३००००/—रू असा एकुण ३४०००/—रूपयाचा मुद्देमाल आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रशांत रामटेके ब.नं. १५७६ मो नं. ९५१८९०३४८८ आहे.

## दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर**— अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा धनगर मोहल्ला, मोहपा येथे दिनांक २२/११/२०२२ चे २२.०० वा. दरम्यान सुमारास फिर्यादी नामे— निठी रामपाल नौरीया, वय ७० वर्ष, रा. मोहपा, धनगर मोहल्ला ही आपले घरी हजर असताना यातील आरोपी नामे— ब्रिजलाल हरबल मोहरीया, वय २९ वर्ष, रा. बघऱ्या, ता. कथुआ जि. सींधीया, मध्यप्रदेश याने फिर्यादीचे घरासमोर येवुन ''तु मला पैसे दे मी तुझी सेवा करीन'' यावर फिर्यादीने नकार दिला असता आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून ढकलढुकल केले. आरोपीने स्वत:जवळील चाकु काढुन फिर्यादीला मारण्यास उचलला असता फिर्यादीने डाव्या हाताने बचाव करीत असताना फिर्यादीच्या बोटाच्या मध्यभागी जखम झाली व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भा.द.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश हिवरकर, मो.नं. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**